प्रेसनोट   दि.१६/०८/२०१७

**डेबीट व क्रेडीट कार्डचे क्लोनींग करून आर्थिक फसवणूक करणाऱ्या नायजेरीयन टोळीच्या म्होरक्यास व साथीदारास सायबर क्राईम सेल, पुणे शहरने बेंगलोर येथुन केली अटक**

पुणे शहरातील अनेक हॉटेल, मॉल, पेट्रोल पंप, एटीएम मशिन येथे स्किमर बसवून डेबीट कार्ड व क्रेडीट कार्डची माहिती प्राप्त करून सदर कार्डचे क्लोनींग करून बनावट कार्ड तयार करून त्यावरून एटीएम मशीनव्दारे रोख रक्कम काढण्याच्या प्रकारामध्ये वाढ होत आहे. गुन्ह्यातील फिर्यादी यांचे डेबीट कार्डचे क्लोनींग करून त्यांच्या डेबीट कार्डसारखे दुसरे डेबीट कार्ड तयार करून त्यावरून रक्कम रु. ६७,०००/- हजार रोख रक्कम काढले गेल्याने खडकी पोलीस ठाणे गु.रं.नं. १७४/२०१७, भा.द.वि. कलम ३७९, ४१९, ४२०, १२० ब, ४६८, ४७१, ४७४ सह माहिती तंत्रज्ञान सुधारित कायदा २००८ चे कलम ४३ अ, ४३ ब, ४३ ग, ६६, ६६ डी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आहे. दाखल गुन्ह्याचा तपास सौ. मनिषा झेंडे, पोलीस निरीक्षक, सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखा या करीत असुन दाखल गुन्ह्यात इसम नामे 1) **Ogbehase Fortune** 2) **Bashar Dakin Gari Usman** 3) **ifeanyi mike mbaeze** या नायझेरीयन इसमांना अटक करण्यात आली होती.

दाखल गुन्ह्याच्या तपासादरम्यान अटक नायजेरीयन आरोपींची टोळी असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यावरुन अटक आरोपींच्या इतर साथिदारांचा शोध सायाबर क्राईम सेल मार्फतीने घेतला जात होता. त्यानुसार गुन्हयातील मुख्य सुत्रदार आरोपी हा मुंबई व बैंगलोर या शहरांमध्ये नेहमी ठिकाणे बदलुन राहत असल्याने त्याला पकडण्यासाठी सायबर क्राईम सेलव्दारे मुंबई व बैंगलोरमध्ये सापळे लावले होते. दि.१०/०८/२०१८ रोजी मुख्य आरोपी हा बेंगलोर येथे असल्याची माहिती मिळाल्याने सायबर क्राईम सेलच्या सौ. मनिषा झेंडे, पोलीस निरीक्षक यांचे एक पथक तात्काळ बेंगलोर येथे रवाना करण्यात आले. सदरच्या पथकाने यातील मुख्य आरोपी **Eremhen Smart** - घर नं.४२,शारदा निलया अपार्टमेंट,भुमिका ले आऊट ३ नंबर, क्रॉस, सप्रगिरी कॉलेज एरिया, बेंगलोर-५७. यास सापळा रचुन ताब्यात घेतले. त्याच्याकडुन ४ मोबाईल, २ लॅपटॉप व १,६५,०००/- रुपये रोख जप्त करण्यात आली आहे. सदर अटक आरोपीविरुध्द बंगलोर, कर्णाटक येथे ११ गुन्हे दाखल असून त्यांपैकी ०४ गुन्ह्यामध्ये पाहिजे आरोपी आहे. तसेच सायबर क्राईम सेल येथे चौकशीवर असलेल्या अर्जामध्ये सदर आरोपीचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर आरोपीकडे तपास केल्यानंतर मुंबई, पुणे, बेंगलोर, तामिळनाडू मध्ये अनेक ठिकाणी स्किमर लावले अनेक डेबीट कार्ड क्लोन केली असल्याचे तपासामध्ये सांगितले आहे. सदर अटक आरोपीला एटीएम मशीनव्दारे पैसे काढून देण्याचे तसेच कमीशनवर विवीध लोकांची बँक अकाऊंट देण्याचे काम साथीदार नामे इर्शाद सत्तार सोळंकी, रा- गोपीभाई नेमसिंग चाल नं-३, बंद्रेकर वाडी, जोगीश्वरी ईस्ट, मुंबई हा करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपी नामे **इर्शाद सत्तार सोळंकी** यास दि.१४/०८/२०१७ रोजी अटक करण्यात आलेली आहे. सदर दोन्ही आरोपींची दि.१७/०८/२०१७ रोजी पर्यन्त पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आली आहे.

सदरची कारवाई ही श्री. सुधीर हिरेमठ, पोलीस उप आयुक्त, सायबर सेल, श्री. मिलींद पाटील, सहा. पोलीस आयुक्त, सायबर सेल, यांच्या मार्गदर्शन खाली पो.नि. सौ. मनिषा झेंडे, सपोनि गवते, पोउपनि मरके, पोउपनि औटी व पोलीस कर्मचारी- दिपक भोसले, अस्लम अत्तार, किरण अब्दागिरे, आदेश चलवादी, शिरीष गावडे, नवनाथ जाधव यांच्या पथकाने केली आहे.

याव्दारे नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, एटीएम सेंटरमध्ये पैसे काढण्यासाठी गेल्यानंतर ए.टी.एम. सेंटरच्या छतावर पीन होल कॅमेरा लावण्यात आला आहे का? याची खात्री करावी. तसेच पासवर्ड टाकत असताना कॅमेरा किंवा दुसऱ्याच्या नजरेत येणार नाही याची दक्षता घ्यावी. कोणत्याही ठिकाणी कार्डव्दारे स्वाईप करताना स्वाईप मशीनला वेगळा स्लॉट बसविला आहे का ? याची खात्री करावी. तसेच असे पेमेंट करीत असताना पासवर्ड दिसेल किंवा पासवर्ड सांगून पेमेंट करू नये.

